**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,**
**कृषि नगर वसमत रोड,परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र )**

| Tel. & Fax No.(02452)229755 | Web:http:www.vnmkv.ac.in | E-mail: /reg_mau@rediffmail.com reg@mkv.ac.in |
|---|---|---|

वाचा : १. शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ५ जानेवारी,२०२२ चे परिपत्रक
२. शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ३१ जानेवारी,२०२२ चे परिपत्रक
३. विद्यापीठ परिपत्रक दि. ०८/०२/२०२२
४.महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.समय २०२०/प्र.क्र.३१/१८(र.वकि.) दि.२३ मे,२०२२

---

" कोरोणा विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून स्थगित केलेल्या बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर पुन्हा सुरु करण्याबाबत. "

# परिपत्रक

क्रंमाक:२०२२/प्र.क्र.६/परिपत्रक /आस्था-८
दिनांक :०८/०६/२०२२

कोरोना विषाणूचा प्रसार राज्यातील कार्यालयामध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी/ कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासकीय कार्यालयामधील बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर उक्त संदर्भ क्रमांक ३ च्या परपित्रकान्वये विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालयामधील-बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर स्थगीत करण्यात आला होता.

आता महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक समय २०२०/प्र.क्र.३१/१८(र.वका.) दि.२३ मे,२०२२ आदेशान्वये कोविड विषयक निर्बंध उठविण्यात आलेले आहेत. तसेच सर्व शासकीय कार्यालयातील उपस्थिती १००- क्षमतेने सुरु झालेली असल्यामुळे सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थिती आता बायोमेट्रिक प्रणालीवरच नोंदविण्यात यावी. अशाप्रकारे उपस्थिती नोंदविताना खबरदारीची बाब म्हणून कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा (जसे मास्कचा वापर,सुरक्षित अंतर, सॅनिटाईझरचा वापर) ऐच्छिकरित्या सुरु ठेवण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सबब, उपरोक्त परपित्रकान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालयामधील अधिकारी /कर्मचारी यांनी कार्यालयात येताना व कार्यालय सोडताना उपस्थिती बायोमेट्रिक प्रणालीवरच नोंदविण्यात यावी असे आपल्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्याल प्रमुख यांना सुचना / निर्देश देण्यात देण्यात यावेत. तसेच सर्व विभाग प्रमुख / कार्याल प्रमुख यांनी कार्यालयामध्ये बायोमेट्रिक प्रणाली पुर्ण क्षमतेने सरु राहण्याची दक्षता घेण्यात यावी. बायोमेट्रिक उपस्थितीशिवाय माहेवारी वेतन अदा केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने,

( धिरजकुमार रा. कदम )
कुलसचिव

प्रतिलीपी :

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि),वनामकृवि,परभणी
२.संचालक संशोधन,वनामकृवि,परभणी
३.संचालक विस्तार शिक्षण,वनामकृवि,परभणी
४. नियंत्रक,वनामकृवि,परभणी
५.विद्यापीठ अभियंता,वनामकृवि,परभणी
६. उपकुलसचिव (आस्था / साप्रवी /विद्या )वनामकृवि,परभणी

यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक हे आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत:

१.प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि,परभणी यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करावे.
२. मा.कुलगुरु महोदय यांचे खाजगी सचिव,वनामकृवि,परभणी.